# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. २०.०४.२०२१

वाचा:- १) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७

२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना/२०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.

४) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,महसूल व वन विभाग,आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग,मुंबई यांचे आदेश क्रं.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दि. २९.१०.२०२०, दि.०३.११.२०२०,दि.१४.११.२०२०, दि. २७.११.२०२०, दि. २१.१२.२०२०, दि. २९.१२.२०२०, दि.२९.०१.२०२१, दि.२४.०२.२०२१,दि.१५.०३.२०२१, दि.२७.०३.२०२१, दि.०४.०४.२०२१, दि.०५.०४.२०२१, दि.१३.०४.२०२१ व दि. २०.०४.२०२१.

५) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दि.३१.१०.२०२०, दि.०४.११.२०२०, दि. १५.११.२०२०, दि. २८.११.२०२०,दि. २२.१२.२०२०, दि.३०.१२.२०२०, दि. २९.०१.२०२१, दि. ०१.०३.२०२१, दि.२१.०३.२०२१, दि.३१.०३.२०२१, दि.०५.०४.२०२१,दि.०६.०४.२०२१,दि.०८.०४.२०२१, दि.१०.०४.२०२१ व दि. १४.०४.२०२१,

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी (Break the Chain) प्रतिबंधात्मक आदेश (दुकानांच्या वेळा बाबत.)

**आदेश**

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक १४ मार्च २०२० अन्वये कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ मधील तरतूदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्या साठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. त्याच प्रमाणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारण हे कोणतीही आपत्ती रोखण्यासाठी किंवा आपत्तीविरुध्द प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आहेत.

ज्याअर्थी, कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून संदर्भ क्र.५ वरील दि.१४.०४.२०२१ च्या आदेशान्वये नांदेड जिल्ह्यात सायं.०८.०० वा ते सकाळी ०७.०० वा.पर्यंत रात्रीची संचारबंदी आदेश दिनांक ३०/०४/२०२१ रोजी रात्री १२.०० वा. पर्यंत लागू करण्यात आली असून संदर्भ क्र. ५ वरील दि. २०.०४.२०२१ च्या आदेशान्वये आणखी काही मार्गदर्शक सुचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी **डॉ.विपीन इटनकर(भा.प्र.से.), जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड जिल्ह्यात दिनांक २० एप्रिल, २०२१ चे रात्री ०८.०० वा.पासून ते दिनांक ०१ मे २०२१ च्या सकाळीं ०७.०० वा पर्यंत खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करीत आहे.**

१. सर्व किराणा सामान, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, कन्फेक्शनरी, सर्व खाद्य पदार्थाचे प्रकार (चिकन, मटण, कोंबडी, मासे आणि अंडी इ. ) कृषीविषयक संबंधित दुकाने, कृषी अवजारे आणि शेतातील उत्पादन, पाळीव प्राण्यांच्या अन्न पदार्थाची दुकाने, पावसाळयाच्या हंगामाशी निगडीत व्यक्तींसाठी तसेच संस्थांसाठी देखील साहित्य मिळणारी दुकाने ही सकाळी ०७.०० ते सकाळी ११.०० च्या दरम्यान उघडी राहतील.

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.**

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

२. या दुकानातून घरपोच सेवा ही सकाळी ०७.०० ते रात्री ०८.०० पर्यंत चालू असेल.

या आदेशात निर्दिष्ट केलेल्या व्यतिरिक्त इतर सर्व अटी ह्या राज्य शासनाचे आदेश दि. १३ एप्रिल, २०२१ नुसार व त्या अनुषंगाने जारी केलेल्या पुरक टिपण्या आणि स्पष्टीकरणांसह लागू राहतील. **सदरचा आदेशांची अंमलबजावणी दिनांक २० एप्रिल, २०२१ चे रात्री ०८.०० वाजेपासून ते दिनांक ०१ मे, २०२१ चे सकाळी ०७.०० वाजेपर्यत लागू राहील.**

सदर आदेशाची अमंलबजावणी करण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नांदेड, पोलीस अधिक्षक नांदेड, आयुक्त, नांदेड वाघाळा महानगरपालीका नांदेड, मुख्याधिकारी, सर्व नगर परीषद / नगर पंचायत यांचे वर रहील.

या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती, संस्था, अथवा समुह, भारतीय दंड संहिता १८६०, साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, मधील तरतुदी नुसार शिक्षेस पात्र राहील. परंतु आदेशाची अंमलबजावणी करताना सदभावनेने केलेल्या कृत्यासाठी कोणत्याही अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द कार्यवाही केली जाणार नाही.

हे आदेश आज दि. २०/०४/२०२१ रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात आले आहेत.

स्वाक्षरित/-

**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड**

**प्रत – माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद .
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
३. पोलीस अधीक्षक, नांदेड.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हा नांदेड.
६. सर्व तहसीलदार जिल्हा नांदेड
७. अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकिय महा.विष्णूपूरी नांदेड
८. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड.
१०. मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत जिल्हा नांदेड
११. जिल्हा माहिती अधिकारी, नांदेड.
१२. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नांदेड.

**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**